शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

शिवाजी विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना कळविणेत येते की, मंगळवार दिनांक ०८ ऑगस्ट, २०२३ रोजी सकाळी १०.१५ वाजता शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या समोरील शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांच्या पुतळयास **मा.कुलगुरुसो प्रा.(डॉ.) डी.टी. शिर्के यांच्या शुभहस्ते, मा. प्र-कुलगुरु प्रा.(डॉ.) पी. एस. पाटील व मा. प्र.कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, मा.प्र. वित्त व लेखाधिकारी श्री. ए. बी. चौगुले, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ डॉ. ए.एन जाधव व संचालक, विद्यार्थी विकास डॉ.पी.टी गायकवाड** यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करणे व फुले वाहण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे .

तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व विद्यार्थी / विद्यार्थिनी या समारंभास उपस्थित राहावे ही विनंती.

PSpatankar

विभागप्रमुख
शिक्षणशास्त्र अधिविभाग

HEAD
Department of Education,
Shivaji University Kolhapur- 416004

संदर्भ क्र. शिवाजी वि./ शिक्षणशास्त्र / ३०
दिनांक : ४ / ८ / २०२३

प्रति,

१) सर्व पदव्युत्तर अधिविभाग प्रमुखांनी आपल्या अधिविभागातील सर्व शिक्षक, शिक्षकत्तर कर्मचारी, विद्यार्थी/ विद्यार्थीनी यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.
२) सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व शिक्षकेत्तर सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.
३) सर्व रेक्टर्स यांनी वसतिगृहातील नोटीस बोर्डवर हे परिपत्रक लावण्याची व्यवस्था करावी व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी सूचना द्याव्यात.
४) प्रमुख, डॉ.आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन यांनी हे परिपत्रक नोटीस बोर्डावर लावण्याची व्यवस्था करावी व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमास उपस्थित उपस्थित राहण्याची सूचना द्यावी.
५) अभियांत्रिकी विभागप्रमुखांनी खालीलप्रमाणे कार्यवाहीची सूचना संबंधिताना द्यावी,
   अ) शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांचे पुतळयाच्या परिसरात स्वच्छता ठेवण्याबाबत.
   ब) शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांचे पुतळयास सकाळी ठीक १०:१५ वाजता पुष्पहार घालण्याची व्यवस्था करावी.
६) उद्यान विभागप्रमुखांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी योग्य त्या कुंड्या ठेऊन कार्यक्रमाची सुशोभितता वाढविण्याची योग्य ती कार्यवाही करावी. तसेच डॉ. बापुजी साळुंखे यांचे पुतळयास पुष्पहार आणून सदर कार्यक्रमाच्या अगोदर अभियांत्रिकी विभागाचे मदतीने घालण्याची व्यवस्था करावी.